| | |
|---|---|
| MHLA120013542026 | **निशाणी क्रमांक ०१ खालील आदेश.** |

अर्ज वाचला. तपासी अंमलदार यांनी निशाणी क्र.०६ वर आणि सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी निशाणी क्र.०१ वर दिलेले म्हणणे वाचले.

०२. मुद्देमाल होंडा C.B शाईन मोटारसायकल नोंदणी क्र. MH-24-BC-8592, चेसीस नंबर. ME4JC65ALJT168509, इंजिन नंबर JC65ET2266262 ही गुन्हा रजिस्टर नंबर ११६/२०२६ या गुन्हयाच्या कामी जप्त असून सदरचा मुद्देमाल न्यायालयात चौकशीवेळी आवश्यक असल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदरील जप्त मद्देमाल अर्जदारास परत देतांना त्यांनी जप्त मुद्देमालाचे आकार, रंगात, रचनेत बदल करण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच सदर मुद्देमाल विक्री करु शकतो असे कथन करीत प्रस्तूतचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती नि.१ वर केली आहे. तपासी अंमलदार यांनी नि.क्र.०६ ला म्हणणे दाखल करुन सदर मोटारसायकल फिर्यादीच्या ताब्यात अटी व शर्तीवर परत करण्यास हरकत नसल्याचे कथन केले आहे.

०३. अर्जदाराने जप्त होंडा C.B शाईन मोटारसायकल नोंदणी क्र.

MH-24-BC-8592, चेसीस नंबर. ME4JC65ALJT168509, इंजिन नंबर JC65ET2266262 चे नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत, एफ.आय.आर चे सत्यप्रत व छायांकित प्रत, विमा पॉलीसी आणि आधारकार्ड इत्यादी प्रती दाखल केलेले आहेत. सदर कागदपत्रे तपासली, यावरून अर्जदार **विवेकानंद दयानंद यादव** हा जप्त वाहनाचा मालक असल्याचे दिसते. **विवेकानंद दयानंद यादव** यांनी विकत घेतलेले असुन सदर वाहनाची नोंद आर.टी.ओ. कार्यालयामध्ये नावावर झाल्याचे दिसुन येते. इतर कोणीही मुद्देमालाची मागणी केलेली नाही.

०४. तपासकामी मुद्देमाल मोटरसायकल आवश्यक आहे असे पोलीसांचे म्हणणे नाही. सदर वाहन हे अर्जदाराच्या मालकीचे असल्याबाबत अभिलेखावर कागदपत्रे दाखल आहेत. तपासी अंमलदार यांनी दिलेले म्हणणे विचारात घेता पोलिस ठाण्यात लावून ठेवण्यासारखी परिस्थिती दिसून येत नाही. सदरचे वाहन खालील अटी व शर्तीवर परत करता येवू शकते. सबब, भारतीय नागरीक सुरक्षा संहीता कलम ५०३ अन्वये मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| **०१.** | अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करणेत येत आहे. |
| **०२.** | तपासी अंमलदार पोलीस स्टेशन निलंगा यांनी गुन्हा रजिस्टर नंबर ११६/२०२६ या गुन्हयातील जप्त मुद्देमाल होंडा C.B शाईन मोटारसायकल नोंदणी क्र. MH-24-BC-8592, चेसीस नंबर. ME4JC65ALJT168509, इंजिन नंबर JC65ET2266262 |

| | |
|---|---|
| | अर्जदार **विवेकानंद दयानंद यादव** यांना पुढे नमुद अटींची पुर्तता केलेनंतर परत द्यावे. |
| **अ.** | अर्जदाराने न्यायालयात रक्कम रूपये ७०,०००/- रूपयेचे क्षतीपूर्ती बंधपत्र (Indemnity Bond) द्यावे. |
| **ब.** | अर्जदाराने त्याचे ओळखपत्र तसेच त्याच्या रहिवासाचा पुरावा, नोंदणी प्रमाणपत्र याच्या प्रती संबंधीत तपासी अधिकारी यांचेकडे दाखल कराव्यात. सदर बाबत संबंधीत अधिकारी यांनी खात्री करावी. |
| **क.** | सदर मुद्देमाल वाहन न्यायालयाच्या परवानगीशिवाय विक्री वा अन्यप्रकारे विल्हेवाट लावणार नाही तसेच न्यायालयाच्या हुकूमाप्रमाणे आवश्यक तेव्हा सदरचे मुद्देमाल वाहन न्यायालयात हजर करणेची, त्याचप्रमाणे सदरचे वाहन अवैध व्यवसायासाठी वापरणार नसल्याबाबत व सदरचा मुद्देमाल अर्जदाराच्या मालकीचा नसल्याचे निष्पन्न झालेस त्याची किंमत न्यायालयात भरणेस तयार असलेबाबत हमीपत्र संबधीत तपासी अधिकारी यांचेकडे दाखल करावे. |
| **ड.** | संबंधीत तपासी अधिकारी यांनी ताब्यात घेतलेल्या मुद्देमालाचे रंगित छायाचित्र घेवून ते या मुद्देमालाचेच आहे याबाबत खात्री करून घ्यावी व तसा शेरा फोटोच्या मागे नमुद करावा. |
| **इ.** | सदर बाबींची पुर्तता झालेवर संबंधीत अधिकारी यांनी सदरील मुद्देमालाबाबतचा फोटो, पंचनामा तसेच रहिवासी पुरावा आणि |

| | |
|---|---|
| | ओळखपत्र तसेच वर नमुद हमीपत्र या न्यायालयात दोषारोपपत्रासोबत पाठवावे. |
| **०३.** | या अटी व शर्तींची पुर्तता तसेच कागदपत्रांची योग्य ती पडताळणी झालेनंतरच अर्जदारास मुद्देमाल वाहन परत द्यावे. |
| **०४.** | प्रस्तुत आदेशाची एक प्रत आणि अर्जदाराचे क्षतीपूर्ती बंधपत्र सदर गुन्हयातील एफ.आय.आर. सोबत ठेवणेकामी संबंधीताकडे सुपुर्द करावा. |
| **०५.** | सदरचे क्षतीपुर्ती बंधपत्र अर्जदाराने दाखल केल्यानंतर मुद्देमाल परत करण्याबाबतचे पत्र पाठविणेत यावे. |
| **०६.** | प्रस्तुत मुद्देमाल वाहनाबाबतच्या अटी व शर्तीबाबत संबंधीत आर.टी.ओ. यांना पत्राने कळवावे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.06.17 18:01:34 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**

**दिनांकः–१७/०६/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, निलंगा.**

**ठिकाणः–निलंगा** **जिल्हा लातूर.**

**(न्यायालय क्र.०१)**